देशोन्नती

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, जिल्हा अग्रणी बँक, सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाचा संयुक्त उपक्रम

# ग्रामीण कुटुंबांकरिता बँकिंग, रि-केवायसी, कर्ज व डिजिटल सेवा

## बार्शीटाकळी येथे बँकांचे वित्तीय समावेशन अभियान



अकोला: ग्रामीण कुटुंबांना बँकिंग, केवायसी, कर्ज व डिजिटल वित्तीय सेवांचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्याकरिता बार्शिटाकळी येथे २० ऑगस्टरोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नागपूर, जिल्हा अग्रणी बँक, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने वित्तीय समावेशन अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक संचालक सचिन वाय. शेंडे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नागपूर, उपमहाप्रबंधक अंजना श्यामनाथ, रिझर्व्ह बँक, नागपूर, अंचलप्रमुख अजय कुमार सिंह सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पुणे आणि आयोजक पंकज कुमार प्रादेशिक प्रमुख, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अकोला, नयन सिन्हा अग्रणी जिल्हा प्रबंधक अकोला आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा प्रबंधक, पिंजर व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

या अभियानात विविध बँकांचे वरिष्ठ अधिकारी, डीडीएम नाबार्ड तसेच एमएसआरएलएम, माविम, सीएफएल केंद्रांचे समन्वयक व बिझनेस करस्पॉन्डंट्स यांनीही सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात, पंकज कुमार प्रादेशिक प्रमुख सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अकोला यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करताना बँकांच्या विविध योजनांची माहिती व त्यांचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. सचिन वाय. शेंडे प्रादेशिक संचालक आरबीआय यांनी वित्तीय समावेशन सॅच्युरेशन कॅम्प, महिला स्वयं-सहायता गट योजना, पीएमजेजेबीवाय, पीएमएसबीवाय व अटल पेन्शन योजना याबाबत मार्गदर्शन केले. अंजना श्यामनाथ उपमहाप्रबंधक आरबीआय यांनी रि-केवायसीचे महत्त्व, त्याची प्रक्रिया तसेच डिजिटल फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक काळजी याबाबत सोप्या व प्रभावी शब्दांत मार्गदर्शन केले. बार्शिटाकळी व ग्रामीण परिसरातील नागरिकांनी या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच महिला स्वयं-सहायता गटांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उल्लेखनीय प्रतिसाद दिला. (Advt)

### 'लक्ष्य' चा शुभारंभ

या प्रसंगी सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाच्या 'लक्ष्य' या नव्या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. तसेच पीएमएसबीवाय व , पीएमजेजेबीवाय या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना धनादेश वाटप करण्यात आले. शेतकरी, महिला उद्योजक व लघुउद्योगांना कर्ज मंजुरी पत्रेही वितरित करण्यात आली.